PEER REVIEWED &
INDEXED (SJIF) JOURNAL

ISSN : 2319-8648
Impact Factor : 7.139

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

|| प्रदीपः सर्वविद्यानाम् ||

**Maharashtra Philosophy Council**
**and**
**Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College, Palghar**

सोनोपंत दांडेकर शिक्षण मंडळी
पालघर

Organized

## Maharashtra Philosophy Council 37th Conference

Date 1st & 2nd October 2021



Theme of Conference

## Contemporary Problems and Role of Philosophers

Philosophy of Dr. Amartya Sen || Philosophy of Modern Saint Vai. Sonopant Dandekar

Executive Editor
**Dr. Kiran Save**

Co-Editor
**Dr. Tanaji Pol**
**Lt. Anagha Padhye Deshmukh**

Chief Editor
**Mr. Arun B. Godam**

www.rjournals.co.in

**CURRENT GLOBAL REVIEWER**
Special Issue 1 , Vol. II | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Oct. 2021 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

# Index


| Sr.No. | Ttile of the paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1. | **Murray Bookchin's Social Ecology: An Alternative Solution to Ecological Crisis** | Dr. Amita Valmiki | 01 |
| 2. | **Living the Constitution in a religio-fanatic society; Mahatma Gandhi on democracy and constitution** | Dr. Tabassum Sheikh | 05 |
| 3. | **A Critical Study of Mahatma Gandhiji as an Iconic Philosopher of the World** | Dr. Surendra S. Khandekar | 09 |
| 4. | **Justice Theory of Amartya Sen with Reference to the Capability Approach** | Dr.Tanaji Pol | 15 |
| 5. | **Amartya Sen Philosophy: Key Points on Contributions of Economics** | Dr. Yogesh M. Kulkarni | 19 |
| 6. | **Philosophical Problem of intolerance with reference to Amartya Sen, Buddha and J. Krishnamurti** | Mr. Jivitesh Patil | 25 |
| 7. | वै. सोनोपंत दांडेकर यांच्या विचारविश्वाचा मागोवा–'ज्ञानदेव व प्लेटो' या ग्रंथाच्या अनुषंगाने | डॉ. मीनल कातरणीकर | 28 |
| 8. | तत्त्वज्ञानाचे उपयोजन व उपयोजित तत्त्वज्ञान | डॉ. शर्मिला वीरकर | 34 |
| 9. | तत्त्वज्ञान की अध्यात्मशास्त्र : कै. सोनोपंत दांडेकर | डॉ. हिरीश नवले | 38 |
| 10. | स्त्रियांच्या सबलीकरणाबाबतीत अमर्त्य सेनची भूमिका | डॉ. संगीता पांडे | 47 |
| 11. | तार्किक प्रत्यक्षार्थवादी विचारवंत आणि प्रचितिक्षमतेचे तत्त्व | डॉ. किरण सावे | 51 |
| 12. | लौकिक जीवनातील समस्यांचे तत्त्वज्ञान करणारा तत्त्वज्ञ: संत गाडगे बाबा | डॉ. राजेसाहेब मारडकर | 57 |
| 13. | आधुनिक संत वैकुंठवासी सोनोपंत दांडेकर यांचे तत्त्वज्ञान : व्यक्ती आणि विचार | प्रा. डॉ. शेडगे विजय सोपानराव | 64 |
| 14. | मॅक्स वेबर यांची सामाजिक दर्जानुसार वर्गपद्धती/गटपद्धती | डॉ. सुनिलदत्त एस. गवरे | 69 |
| 15. | बुद्धांच्या अव्याकृत प्रश्नांची तात्त्विक सिद्धता | प्रा. डॉ. अमन बगाडे | 74 |
| 16. | अमर्त्य सेन यांची आर्थिक व तात्त्विक भूमिका | प्रा. डॉ. सचिन खोकले | 77 |
| 17. | पर्यावरणीय समस्या आणि तत्त्ववेत्यांची भूमिका | डॉ. वेदप्रकाश डोणगावकर | 81 |
| 18. | वारकरी संतांचा पर्यावरणाबद्दलचा विचार: एक विवेचन | डॉ. रीना अविनाश पितळे पुराडकर | 85 |

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 1 , Vol. II | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648

Oct. 2021 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139



| | | | |
|---|---|---|---|
| 19. | दर्शनः एक तौलनिक अभ्यास | डॉ. रेखा मारोतराव शेरकर | 92 |
| 20. | गांधीप्रणीत शैक्षणिक धोरण आणि त्याची प्रस्तुतता | अनघा अरुण पाध्ये | 95 |
| 21. | संशोधन विषयाची निवड व महत्त्व | प्रा. डॉ प्रभाकर रामलिंग कीर्तनकार | 100 |
| 22. | ग्रामगीतेतील जीवन–शिक्षण संदर्भातील विचार : एक चिंतन | डॉ. धनराज सुभाष हाडुळे | 102 |
| 23. | महात्मा गांधीचा 'स्त्री' विषयक दृष्टिकोन : चिकित्सक विश्लेषण | डॉ. शितल रुद्रमुनी येरुळे | 108 |
| 24. | अस्तित्ववादी तत्त्वज्ञ अल्बर्ट काम्यूचा मृत्युविषयक दृष्टिकोन | डॉ. रोहित सुधाकर गायकवाड | 113 |
| 25. | शं. वा. दांडेकर लिखित 'ईश्वरवाद' ग्रंथाचे तात्त्विक विवेचन | डॉ. दर्शना चौधरी | 116 |
| 26. | स्त्री सक्षमीकरण आणि वास्तव | प्रा. डॉ. बाजीराव माणिकराव पाटील | 120 |
| 27. | नालंदा विद्यापीठ संपन्न ज्ञानकेंद्राच्या पुनरुभारणीसाठी डॉ. अमर्त्य सेन यांचे योगदान | प्रा. डॉ. शीला गोडबोले पाईकराव | 124 |
| 28. | तत्त्वज्ञान विस्तारातील अडचणी | श्री. अनिल लक्ष्मणराव शिंदे | 128 |
| 29. | महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली झालेल्या चळवळींचे तात्विक आधार | प्रा. संतोष भावार्थे | 130 |
| 30. | स्त्रियांच्या सामाजिक समस्या | प्रा. स्वामी सोनू मन्मथ | 134 |
| 31. | भारतीय शिक्षणप्रणाली आणि स्वामी विवेकानंद यांचे शिक्षणविषयक विचार | श्रीमती सुप्रिया प्रणय राऊत | 137 |

**CURRENT GLOBAL REVIEWER**
Special Issue 1 , Vol. II | Oct. 2021 | Peer Reviewed | SJIF Impact factor | ISSN : 2319 - 8648 | Impact Factor : 7.139

# अस्तित्ववादी तत्त्वज्ञ अल्बर्ट काम्यूचा मृत्युविषयक दृष्टिकोन

**डॉ. रोहित सुधाकर गायकवाड**
सोनोपंत दांडेकर कला, व.
श्री. आपटे वाणिज्य व एम. एच. मेहता विज्ञान महाविद्यालय, पालघर

---

अल्बर्ट काम्यूचा जन्म इ. स. १९१३ मध्ये अल्जेरियातील मॉडॉव्ही येथे झाला. पहिल्या महायुद्धात वडिलांचे निधन झाल्याने आईने सांभाळ केला. अल्जेरिया विद्यापीठात शिक्षण झाले. १९३४ मध्ये कम्युनिस्ट पक्षाचा सदस्य बनला; परंतु, अल्प काळात मतभेद झाल्यामुळे सदस्यत्वाचा राजीनामा दिला. १९३४ ते १९३९ या काळात थिएटरसाठी नाटके लिहिली. पॅरिस येथे आल्यानंतर वर्तमानपत्रासाठी लिखाण करू लागला. दुसऱ्या महायुद्धात नाजीविरुद्ध लढण्यासाठी निर्माण झालेल्या संघटनेत सहभागी झाला. या संघटनेमार्फत चालविल्या जाणाऱ्या Combat या गुप्त वर्तमानपत्राचे संपादन केले. १९४२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या' स्ट्रेंजर' साहित्यकृतीमुळे साहित्यिक जगात खूपच प्रसिद्धी मिळाली.' द मिथ ऑफ सिसिफस', 'द रिबेल' या तात्त्विक ग्रंथांमुळे वैचारिक क्षेत्रात काम्यूचा दबदबा वाढला.' द आऊटसायडर',' प्लेग' इत्यादी कादंबऱ्या, याशिवाय कथासंग्रह आणि नाटके अशा बहुविध साहित्यनिर्मितीमुळे काम्यूचे नाव जगभर पसरले. त्याच्या साहित्यिक कामगिरीचे मोल लक्षात घेऊन १९५७ मध्ये साहित्याचे नोबेल पारितोषिक मिळाले. अल्जेरियातील यादवी युद्धकाळात शांतता निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. १९६० साली काम्यूचे अपघाती निधन झाले. काम्यूच्या लेखणाला दुसऱ्या महायुद्धाने निर्माण केलेल्या परिस्थितीचा संदर्भ आहे. दुसऱ्या महायुद्धाने निर्माण केलेल्या परिस्थितीमुळे व्यक्तिजीवनाची निरर्थकता जाणवू लागली.

काम्यूच्या साहित्यिक रचना आणि वैचारिक लेखनात मानवी जीवनाच्या निरर्थकतेचे चिंतन केलेले आहे.' द मिथ ऑफ सिसिफस' या वैचारिक लेखनाचा विषयदेखील निरर्थकता आहे. अल्बर्ट काम्यू absurdity या संकल्पनेविषयी, द मिथ ऑफ सिसिफस संकल्पनेविषयी सखोल काम्यू सिसिफस या ग्रीक लोककथेच्या आधारावर निरर्थकतेविषयी विचारमांडणी करतो. ईश्वराने केलेल्या शिक्षेमुळे सिसिफस डोंगराच्या शिखरावर शिळा नेण्याचा प्रयत्न करतो, पण वारंवार ती शिळा घसरते. मात्र, सिसिफस कुठलाही अंहकार व आवेश न दाखवता शांतपणे आपल्या वाट्याला आलेले दुःख सहन करत असतो. दुःखापासून पलायन करण्याचा प्रयत्न न करता धैर्याने सामोरे जातो. आत्महत्या करण्याचा प्रयत्न करत नाही. निरर्थक शिक्षा भोगत असतानाही आपल्या जीवनाला अर्थपूर्णता बहाल करतो. सिसिफसचा जीवनसिध्दांत समाजाला लागू पडतो असे म्हणतो.

काम्यू अल्बर्ट काम्यू हे अस्तित्ववादातील एक महत्त्वपूर्ण तत्त्वचिंतक म्हणून ओळखले जातात. त्यांनी प्रत्यक्ष—अप्रत्यक्षपणे मृत्युविषयक विचार मांडले आहेत. त्यांचे मृत्युविषयक विचार हे त्यांच्या आत्महत्या या संकल्पनेतून स्पष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. त्यांनी आपल्या' द मिथ ऑफ सिसिफस' या वैचारिक लेखनात आपले विचार मांडले आहेत.

त्यांच्यामते, मनुष्याच्या जीवनात हताशेमुळे जीवनाच नेमका अर्थ काय हे उमगत नाही. निरर्थकता ही मानवी जीवनाचा भाग असल्यामुळे तिचा सामना करण्याशिवाय पर्याय नसतो. व्यक्ती आणि बाह्य जग यांच्यातील परस्परसंबंधातून निरर्थकतेची जाण होते. ही निरर्थकता मानवाच्या दृष्टीने कितीही त्रासदाय असलीतरी आत्महत्या करणे हे टोकाचे नकारात्मक स्वरूपाचे कृत्य आहे. परमेश्वर मानणे व आत्महत्या करणे म्हणजे निरर्थकतेपासून पलायन करण्याचा मार्ग आहे. मानवाच्या आत्मप्रतिष्ठेला हे कृत्य शोभणारे नाही. सत्यापासून दूर पळणे म्हणजे स्वतःच्या अस्तित्वाला नाकारण्यासारखे आहे. शिळा ढकलण्यासाठीची शिक्षा सिसिफस आनंदाने भोगून निरर्थकतेला सामोरे जातो. त्याप्रमाणे मानवाने निरर्थकता वा असंगतता हा जीवनाचा एक भाग मानून धैर्याने जीवन जगण्यातच अस्तित्वाचे खरे दर्शन आहे, असे मानतो.

ईश्वर, परलोक, प्रारब्ध इत्यादी गोष्टी काम्यूला निरर्थक वाटतात. व्यक्ती स्वतःचे प्राक्तन निश्चित करत असते. मृत्यू या सत्याचा व्यक्तीने स्वीकार केलेला असतो. स्वतःची फसवणूक न करता सत्याला सामोरे जाणे, हे अस्तित्वाचे खरे सार आहे. विशाल जग मानवापेक्षा मोठे असलेतरी मानवात सुप्त सामर्थ्य असते. या सामर्थ्याच्या जोरावर स्वतःला बदलण्याची, नाकारण्याची क्षमता व्यक्तीच्या ठिकाणी असते. माणसाचे अस्तित्व चैतन्यशाली असते. कार्यकारणभाव जाणण्यास आणि सुसंगतता आणण्यासाठी तो प्रयत्नशील असतो पण त्याला ते साध्य होत नाही. त्यामुळे जगाविषयी मानवाला संताप येत असतो. आदर्श म्हणून स्वीकारलेल्या तत्त्वांचे उच्चाटन होताना प्रत्यक्ष अनुभवाला येते. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मानवतावादी मूल्यांचा मोठया प्रमाणावर हास झाला. मानवामानवांतील परस्परसंबंध संघर्ष आणि शत्रुत्वावर आधारलेले बनल्यामुळे सर्वत्र द्वेष, मत्सराचा प्रभाव वाढून मानवाचा मानवावर विश्वास राहिला नाही. या जगात जीवन जगताना क्षणाक्षणाला निरर्थकता व रितपेणाची जाणीव होत होती. अशा परिस्थितीत मानवी स्थितीचे प्रखर भान बंडखोरीस जन्म देते.

मानवाची हरवलेली प्रतिष्ठा प्रस्थापित करण्यासाठी बंडखोरीशिवाय पर्याय नसतो. रुढीची चौकट नष्ट करण्यासाठी बंडखोरी आवश्यक असते. विधायक ध्येय नजरेसमोर ठेवून बंडखोरी केलेली असते. बंडखोरी ही निर्मितिक्षम असली पाहिजे अन्यथा तिची परिणती अराजकता वा शून्यवादात होण्याची शक्यता असते. काम्यूला अभिप्रेत बंडखोरी राजकीय व्यक्तीच्या अंतरात्म्याशी संबंधित आहे. स्वरूपाची नसून व्यक्तीच्या अंतरात्म्याशी संबंधित आहे.

काम्यू मानवी अस्तित्वाची चर्चा करताना तीन विकल्पांच्या आधारावर विश्लेषण करण्याचा प्रयत्न करतो. ते तीन विकल्प म्हणजे आत्महत्या करणे, आशावादी बनणे आणि जीवन जगत राहणे. या तीन विकल्पांपैकी आत्महत्या करणे हे समस्येचे समाधान नसून, पलायनाचा मार्ग आहे. आशावादी बनणे हा विकल्प योग्य वाटत असलातरी आत्महत्या करणे आणि आशावादी बनणे यात फारसे अंतर नाही, म्हणून जीवन जगत राहणे हा तिसरा विकल्प मानवाच्या स्थितीचे मूलत्त्व आहे. मानवासमोर एक पर्याय आहे तो म्हणजे जीवन जगत राहणे आणि जीवनातील संघर्ष आणि निरर्थकता या वास्तवतेचा स्वीकार करणे आहे. मानवासमोर उभे असलेले विश्व हे सर्वस्वी त्याला परके आहे. ते बुध्दिप्रणीत वा ईश्वरनिर्मित तत्त्वावर आधारलेले वा निर्माण झालेले नाही. ते आंगतुक व निरर्थक आहे. या परिस्थितीत स्वतःची मूल्ये स्वतः

निर्माण करणारा, या मूल्यांना विश्वात आधार आहे अशी खोटी आशा न बाळगता जगणारा आणि मानवाची ही खरीखुरी परिस्थिती जाणून जगणे म्हणजे खऱ्या अर्थाने अस्तित्ववादी जगणे होय, असे काम्यू मानतो.

अस्तित्ववादी विचारवंत काम्यू हा मनुष्य स्वतंत्र आहे, आपल्या कृतीला तो स्वतः उत्तरदायी आहे असे मानतो. राजकीय व्यवस्था कोणत्याही प्रकारची असो, व्यक्तीच्या मताला महत्त्व असो वा नसो, त्याचा प्रभाव असो वा नसो, व्यक्ती आपल्या अस्तित्वाची अभिव्यक्ती करणार त्यामुळे काम्यू व्यक्तीच्या मूल्यांचे सरंक्षण करणाऱ्या व्यवस्थेला पाठिंबा देतो. अल्बर्ट काम्यूच्या विचारांवर पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाचा प्रभाव पडलेला दिसतो. काम्यू दुसऱ्या महायुद्ध काळात गुप्त वार्तापत्र काढत होता. त्यामुळे तत्कालीन सामाजिक व राजकीय घडामोडींत त्याचा सक्रिय सहभाग होता. त्यामुळे त्याने केलेले बंडखोरीविषयीचे विश्लेषण तात्त्विक स्वरूपाचे नसून जीवनानुभवातून उमगलेले वास्तविक सत्य आहे.

अलबर्ट काम्यू हा अस्तित्ववादातील निरीश्वरवादी तत्त्वज्ञ असून त्यांने मृत्युविषयक संखोल चिंतन केले आहे. काम्यू यांनी मानवी अस्तित्वाचे विश्लेषण तीन विकल्पाच्या आधारांवर केले आहे. ते तीन विकल्प म्हणजे, १) आत्महत्या करणे, २) आशावादी बनणे, ३) जीवन जगत राहणे. या विकल्पात आत्महत्या या मृत्यूप्रकाराविषयी मत व्यक्त केले आहे. ते मानवाला सूचित करतात मनुष्यजीवनात समस्या या अनिवार्यपणे असतात परंतु आत्महत्या करणे हे समस्येचे समाधान नाही. आत्महत्या करणे मानवाच्या आत्मप्रतिष्ठेला शोभणारे कृत्य नाही म्हणून माणसाने समस्याचे निराकरण करून आनंदाने जीवन जगावे, असे मत काम्यू मांडताना दिसतात. यात मृत्यूबाबत मत स्पष्ट करताना ईश्वर, परलोक, प्रारब्ध इत्यादी गोष्टी काम्यूला निरर्थक वाटतात. व्यक्ती स्वतःचे प्राक्तन निश्चित करत असते.' मृत्यू या सत्याचा व्यक्तीने स्वीकार केलेला असतो. स्वतःची फसवणूक न करता सत्याला सामोरे जाणे हे अस्तित्वाचे खरे सार आहे.' यामध्ये काम्यू यांनी मृत्यू एक अटळ सत्य आहे. त्यापासून दूर न जाता जीवनातील निरर्थकता, नैराश्य बाजूला सारून आंनदाने, आशेने जीवन जगणे आवश्यक आहे, असा संदेश दिला आहे.

अस्तित्ववादातील निरीश्वरवादी तत्त्वचिंतक अल्बर्ट काम्यू यांनी मानवी अस्तित्वाच्या विश्लेषणासंदर्भात अस्तित्वाचे तीन पर्याय सांगताना त्यांतील आत्महत्या या पर्यायाचे विश्लेषण करताना मृत्यूबाबतचे मत मांडले आहे. त्यांच्या मते, मृत्यू एक अटळ सत्य आहे. त्यापासून दूर न जाता जीवनातील निरर्थकता, नैराश्य बाजूला सारून आंनदाने, आशेने जीवन जगणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

- डोंगरे, आधुनिक व आधुनिकोत्तर साक्षेपी पाश्चात्त्य तत्त्वज्ञान, अथर्व प्रकाशन, २०१६, अहमदनगर
- अग्रवाल श्याम, मृत्यू म्हणजे नेमके काय?, संध्यानंद, २४ मार्च, २०१५,
- मौलाना वहीदुद्दीन खान, मृत्यचे स्मरण, सेंटर फॉर पीस आणि स्पिरिअटली, न्यू दिल्ली, २०१६, मराठी अनुवाद
- खासगीवाले मेधा, प्रवास आणि मृत्युपश्चात जीवन, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
- पिपंळकर आनंद, आनंदी मृत्यू, आनंदी वास्तू प्रकाशन, पुणे, २०१५




**OUR MISSION**

**"TO SPREAD OF HIGHER EDUCATION IN RURAL AND TRIBAL YOUTH AND SPECIALLY THE WOMEN FOLK."**

**OUR GOAL**

**"TO PROVIDE HIGHER AND BETTER EDUCATION TO ALL."**

**PEER REVIEWED & INDEXED (SJIF) JOURNAL**

**ISSN : 2319-8648**

**Impact Factor : 7.139**

# Current Global Reviewer

**Peer Reviewed International Referred Research Journal Registered & Recognized Higher Education For All Subjects & All Languages**

2319-8648

**www.rjournals.co.in**